ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 9 | MAY - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# बार्शी तालुक्यातील कुणबी समाजाविषयक नवमांडणी



प्रो.डॉ.राजेंद्र गायकवाड
इतिहास विभागप्रमुख,
विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालय, टेंभुर्णी ता. माढा, जि. सोलापूर .

सोलापूर जिल्हयातील बार्शी हे पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडयाच्या प्रवेशद्वारावरील महत्त्वाचा तालुका आहे. मराठवाडयाचे प्रवेशद्वार म्हणून बार्शीला ओळखले जाते. लातूर, नांदेड, अहमदनगर, सोलापूर, धाराशिव, तुळजापूर, येरमाळा प्रमुख शहरांना जोडणारे हमरस्ते बार्शीवरूनच पुढे जातात. अखंड महाराष्ट्राचे आराध्य् दैवत आई तुळजाभवानी चे तुळजापूर हे शक्तीपीठ बार्शीपासून अवघ्या ५० किमी. अंतरावर आहे. तर येरमाळयाच्या येडाई देवस्थानापासून बार्शी ३० किमी अंतरावर आहे. पंढरपूरचा विठ्ठलाच्या दर्शनाला आषाढी-कार्तिकी एकादशीला मराठवाडयातून येणाऱ्या सर्व दिंडया बार्शीवरूनच येतात. शिवाय नुकताच केद्र् सरकारने मंजूर केलेला सुरत-चेन्नई हरीत मार्ग बार्शी तूनच जात आहे. पुणे ते लातूर-नांदेड कडे जाणाऱ्या लोहमार्गावरील बार्शी हे स्थानक आहे. शिवाय दक्षिण भारताला जोडणाऱ्या लोहमार्गाच्या कुर्डूवाडी या मध्यवर्ती रेल्वे स्थानकापासून बार्शी केवळ ३० किमी आहे. बार्शी शहर दळणवळण मार्गावरील महत्त्वपूर्ण शहर आहे.

बार्शीला फार प्राचीन ऐतिहासिक वारसा लाभला आहे. प्राचीन कालखंडापासून भगवंताची नगरी म्हणून बार्शीची ओळख आहे. ब्रिटिशकाळात लिहिल्या गेलेल्या १८८४ सालच्या सोलापूर जिल्हयाच्या गॅझेटमध्ये बार्शी तालुक्याविषयी विस्तृत माहिती आढळते. यानुसार बहामनी काळ, आदिलशाही, निजामशाही, शिवकाळ, पेशवाईचा कालखंड या दरम्यान सोलापूर जिल्हयातील राजकीय स्थित्यंतरे घडत असताना तिचा प्रभाव बार्शी वरती सातत्याने पडल्याच्या नोंदी आढळतात. पेशवे नानासाहेबांच्या काळात सदाशिवराव भाऊनी उदगीरच्या लढाईत निजामाचा पराभव केल्यानंतर बार्शी त्यांच्या अखत्यारीत आल्याचे दिसते. यावेळी नानासाहेब पेशव्यांनी बार्शीतील भगवंत देवस्थानला एक सनद देवून खर्चाची सोय केल्याचे केली होती. पेशवाईच्या अस्तानंतर इ.स. १८२३ व १८४७ साली इंग्रज सरकारनेही अशा सनदा देवून भगवंत मंदीर देवस्थानचा खर्चाचा विषय मिटवल्याचे दिसते. अशा प्रकारचा ऐतिहासिक वारसा बार्शी शहर आणि परिसराला लाभला आहे. बार्शी तालुक्यात विविध समाजाची लोकवस्ती आहे.

कायम दुष्काळग्रस्त् म्हणून ओळखल्या गेलेल्या बार्शी तालुक्याने आर्थीक, शैक्षणिक, आरोग्य् क्षेत्रात प्रचंड प्रगती केली आहे. कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांनी स्थापन केलेल्या श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाने शाळा, कॉलेजेस, अद्ययावत दवाखाने उभे करून तालुक्याचा आणि परिसराचा कायापालट केला आहे. आजघडील बार्शी हे महाराष्ट्रातील वैद्यकीय सुविधांचे केंद्र् बनले आहे. महाराष्ट्रातील प्रमुख बाजारपेठांपैकी बार्शी एक आहे. बार्शीच्या परिसरात बहूतांश लोकांचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. शेतीतून पिकणाऱ्या खरीप आणि नगदी पिकांनी बार्शीची बाजारपेठ नावारूपास आली आहे. तूर, हरभरा, सोयाबीन, ज्वारी, कांदा इ. पिकांच्या खरेदी विक्रीचे बार्शी हे महाराष्ट्रातील महत्वाचे केंद्र् आहे. येथे दर शनिवारी आठवडा बाजारला जनावरांचा मोठा बाजार भरतो.

बार्शीतील सामाजिक स्थिती लक्षात घेता, सर्व जात समूह आनंदाने राहतात. जातपात धर्मभेद न पाळता ग्रामदेवता भगवंताच्या समोर सर्वजण नतमस्त्क होतात. विविध धर्मीयांचे सणोत्सवात सर्वजण उत्साहाने सहभागी होतात. बार्शी मध्ये प्रामुख्याने मराठा समाज मोठया प्रमाणात वास्तव्यास आहे. तालुक्यात बहूसंख्येने असलेल्या मराठा समाजाचे शेती हेच प्रमुख उदरनिर्वाहाचे साधन आहे. ही बाब प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यामागील प्रेरणा आहे. प्रस्तुत शोधनिबंधामागे बाशी तालुक्याचा ऐतिहासिक मांडणी करण्याचा मुळीच नाही, तर मागील दीडवर्षापासून मराठा संघर्ष योध्दा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रभर जे कुणबी मराठा आरक्षणाचे आंदोलन सुरू आहे. यामुळे महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनावर झालेल्या दृष्य् परिणामाचा थोडक्यात आढावा घेण्यासाठी, बार्शी तालुक्याला मध्यवर्ती ठेवून मांडणी करण्याचा प्रयत्न् आहे.

बार्शी तालुक्यात एकूण १३९ गावे आहेत. बार्शी तालुक्यात बार्शी हे मोठे शहर आहे. बार्शी आणि आजूबाजूच्या परिसरातून रोजगार, शिक्षण, आरोग्य्, यासारख्या गरजा भागवण्यासाठी बार्शी शहराकडे मोठया प्रमाणात स्थलांतर झाले आहे. यामुळे बार्शी शहरातील लोकसंख्या सर्वधर्मीयांची दिसते. प्रस्तुत शोधनिबंधाच्या निमित्ताने केवळ बार्शी तालुक्यात मनोज दादा जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षण चळवळीमुळे मराठा समाजाचा ओ.बी.सी. कुणबी प्रवर्गामध्ये किती संख्या झाली असेल याविषयी मांडणी करण्याचा हेतू आहे. सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयाने एन.आय.सी. पोर्टलवर अपलोड केलेल्या यादी नुसार ढोबळमानाने आकडेवारी निश्चित करण्याचा प्रयत्न् केला आहे. बार्शी तालुक्यातील खालील ७२ गावांमध्ये कुणबीच्या मोडी व देवनागरी लिपीत नोंदी सापडल्या आहेत.

| अ.क्र. | गावाचे नाव | अ.क्र. | गावाचे नाव | अ.क्र. | गावाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | आगळगाव | २५ | जामगाव पा. | ४९ | बोरगाव खु. |
| २ | आंबेगाव | २६ | झरेगाव | ५० | बळेवाडी |
| ३ | उपळे दुमाला | २७ | झाडी | ५१ | बोरगाव झा. |
| ४ | उंडेगाव | २८ | तडवळे | ५२ | बेलगाव |
| ५ | बार्शी शहर | २९ | तुर्कपिंपरी | ५३ | बावी |
| ६ | कव्हे | ३० | ताडसौंदणे | ५४ | बाभूळगाव |
| ७ | कळंबवाडी पानगाव | ३१ | धानोरे | ५५ | बोरगाव खु. |
| ८ | कांदलगाव | ३२ | धोत्रे | ५६ | भोयरे |
| ९ | कोरफळे | ३३ | नागोबाचीवाडी | ५७ | मानेगाव |
| १० | काटेगाव | ३४ | निंबळक | ५८ | मालवंडी |
| ११ | कुसलंब | ३५ | पिंपरी पानगाव | ५९ | मांडेगाव |
| १२ | खडकोणी | ३६ | पिंपरी सा. | ६० | महागाव |
| १३ | खांडवी | ३७ | पिंपळगाव पानगाव | ६१ | ममदापूर |
| १४ | गाडेगाव | ३८ | पानगाव | ६२ | मळेगाव |
| १५ | गाताचीवाडी | ३९ | पांगरी | ६३ | यावली |
| १६ | गौडगाव | ४० | पिंपळवाडी | ६४ | रूई |
| १७ | गोरमाळे | ४१ | पांढरी | ६५ | रातंजन |
| १८ | गुळपोळी | ४२ | पुरी | ६६ | रास्तापूर |
| १९ | घाणेगाव | ४३ | फफाळवाडी | ६७ | लक्ष्याचीवाडी |
| २० | घारी | ४४ | बळेवाडी | ६८ | वालवड |
| २१ | चारे | ४५ | बोरगाव झा. | ६९ | वानेवाडी |
| २२ | चिंचखोपण | ४६ | बेलगाव | ७० | शेळगाव |
| २३ | जवळगाव | ४७ | बावी | ७१ | साकत |
| २४ | जामगाव आ. | ४८ | बाभूळगाव | ७२ | हतीज |

बार्शी तालुक्यातील वरील बहुतांश गावात अस्तित्वात असलेल्या मराठा समाजातील प्रत्येक आडनावामध्ये कुणबी ही जात दिसते. सधन — निर्धन असा कुठलाही भेदभाव न करता कष्ट्करी, श्रमकरी मराठा समाजाच्या शेती पिकवण्याच्या पिढीजात व्यवसायानुसार त्याला कुणबी असे म्हटले गेले आहे. बार्शी तालुका व बार्शी नगर पालिकेत अशा जवळजवळ २० हजार नोंदी आज आपल्यालाकडे उपलब्ध आहेत. बार्शी तालुक्यातील सर्व मराठा समाजाने कुणबी प्रमाणपत्र काढून घेतल्यानंतर बार्शी तालुक्यातील एकूणच सामाजिक रचनेत बदल दिसणार आहे. पुर्वीचे ओ.बी.सी. आणि कुणबी म्हणुन नव्याने ओबीसी प्रवर्गात समाविष्ट् झालेले मराठा ओ.बी.सी. यामध्ये संघर्ष अटळ आहे. मग तो राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक लाभाचा अशा कोणत्याही पातळीचा असणार आहे. हा प्रश्न् फक्त् बार्शी तालुक्यापुरता मर्यादित नसून संपूर्ण राज्यापुढे असणार आहे. शिवाय पुरावे असतानाही ओ.बी.सी. चे आत्तापर्यंत लाभ न मिळणे ही सल मराठा समाजात असेल. बार्शी तालुक्यातील मराठा व आत्ताचा नव ओ.बी.सी. अर्थात कुणबी समाज शेती, व्यापार, उद्योग, विज्ञान, तंत्रज्ञान, नाटय, कला, क्रिडा अशा सर्व क्षेत्रात आपली प्रगती करत आहे. भविष्यात आरक्षणातून मिळालेल्या संधीच्या जोरावर उच्च् शिक्षण, नोकरी, व्यवसाय इ. विविध क्षेत्रात तो यशस्वी घोडदौड करू शकणार आहे.

मनोज दादा जरांगे पाटील यांच्या आंदोलनाकडे दुर्लक्ष करणे महाराष्ट्र् सरकारला जड गेल्याने सरकारने आपल्या पातळीवरती न्या. शिंदे समितीच्या माध्यमातून मोडी, देवनागरी लिपीमध्ये अस्तित्वात असणारी महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्हा व तालुक्यातील सरकारी अभिलेखागारातील कागदपत्रे शोधण्याची मोहिम राबवली. यामुळे जवळजवळ दीडशे ते दोनशे वर्षापूर्वीपासूनची सुस्थितीतील जन्म् मृत्यूच्या नोंदीची नमुना १४ ही कागदपत्रे, भूमिअभिलख कार्यालयातील नमुना ३३ व ३४ ही कागदपत्रे मराठा समाजाला कुणबी अशी ओ.बी.सी. प्रवर्गात आरक्षणास गरजेची कागदपत्रे सापडली. महाराष्ट्राच्या सर्व तालुक्यात अशा प्रकारच्या कागदपत्रातून जवळजवळ ५४ लाख कुणबी नोंदी शोधून काढण्यामध्ये महाराष्ट्र् सरकार यशस्वी झाले. याचाच अर्थ असा होता की, महाराष्ट्रातील बहूतांश शेती करणारा मराठा समाज दीडशे दोनशे वर्षापूर्वी कुणबी या नावाने नोंदवला गेला. परंतू मधल्या काळात काही चुकांमुळे त्याच्या जातीच्या रकान्यात कधी मराठे, मराठी, मराठा अशा प्रकारे शब्दांची अदलाबदली झाल्याने मुळचाच कुणबी म्हणजेच ओ.बी.सी. आरक्षणाचा लाभार्थी असणारा मराठा समाज आरक्षणाच्या अभावी मागास बनत गेला. हे आता जवळ जवळ निश्चित झाले आहे. मराठा समाजाच्या न्याय हक्कासाठी मनोज दादा जरांगे पाटील यांनी घेतलेल्या अथक परिक्षमामुळे आज मराठा समाजाला ओ.बी.सी. प्रवर्गात सरसकट प्रवेश मिळण्याचा मार्ग सापडला आहे. दादांच्या या आंदोलनाच्या यशामुळे महाराष्ट्रातील ओ.बी.सी. च्या रचनेमध्ये बदल होणार आहे. भविष्यात शासन ज्यावेळेस जनगणणा करेन त्यावेळेसच ही निश्चित आकडेवारी समोर येईल.

**संदर्भ** :

१. सोलापूर जिल्हा गॅझेटियर
२. सोलापूर जिल्हाधिकारी वेबसाईटस
३. बार्शी तहसीलदार अभिलेखागार प्रत्यक्ष भेट
४. विविध नव ओबीसी कुणबींची प्रत्यक्ष मुलाखती व निरीक्षणे
५. विविध वर्तमानपत्रे — सकाळ, लोकमत, पुढारी, लोकसत्ता इ.